**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी ४११ ०१८**

# जाहीरात क्रमांक १८४/२०२२
# पूर्वचारित्र्य वर्तणूक पडताळणी व शारिरीक पात्रता तपासणीबाबत
# जाहीर निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील गट ब व गट क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरात क्र.१८४/२०२२ मधील अतिरिक्त कायदा सल्लागार, विधी अधिकारी, कोर्ट लिपिक, ॲनिमल किपर, समाजसेवक, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कनिष्ठ अभियंता,स्थापत्य, लिपिक, कनिष्ठ अभियंता(विद्युत), विभागिय अग्निशमन अधिकारी व उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदांकरीता उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी तसेच अपात्र उमेदवारांची यादी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दिनांक ०१/१२/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

कर्मचारी निवड समितीने शिफारस केलेल्या निवड यादीतील **अतिरिक्त कायदा सल्लागार, विधी अधिकारी, कोर्ट लिपिक, ॲनिमल किपर, समाजसेवक, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कनिष्ठ अभियंता(स्थापत्य), कनिष्ठ अभियंता(विद्युत) व लिपिक (शेवटच्या परिच्छेदातील प्रवर्ग वगळून)** या पदावरील उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी शासन निर्णयानुसार उमेदवारांची पूर्वचारित्र्य वर्तणूक पडताळणी व शारिरीक पात्रता तपासणी (वैद्यकीय तपासणी) करुन घेणे आवश्यक आहे. त्याकरीता उमेदवारांना पूर्वचारित्र्य वर्तणूक पडताळणी व शारिरीक पात्रता तपासणी (वैद्यकीय तपासणी) करण्याबाबत **दि.०५/०१/२०२४ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० वाजता, सामान्य प्रशासन विभाग, ४ था मजला, मुख्य प्रशासकीय इमारत, पिंपरी चिंचवड महानगरपालिका** येथे उपस्थित राहण्याकामी पत्र उमेदवारांचे अर्जामध्ये नमूद ई-मेलवर पाठविण्यात आलेले आहे. पत्रात नमूद कालावधीत व स्थळी संबंधित उमेदवारांनी उपस्थित राहण्याची दक्षता घ्यावी.

**तथापि, लिपिक संवर्गातील इतर मागासवर्ग (महिला), खुला (खेळाडू), खुला(अनाथ), खुला (अंशकालीन) व ईडब्ल्युएस (खेळाडू) या प्रवर्गातील उमेदवारांना पूर्वचारित्र्य वर्तणूक पडताळणी व शारिरीक पात्रता तपासणी (वैद्यकीय तपासणी) करुन घेण्याबाबत स्वतंत्रपणे तारीख व वेळ अर्जामध्ये नमूद केलेल्या ई-मेलवर कळविण्यात येईल. याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

**(मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने)**

क्र.साप्रवि/०४/कावि/१०५७/२०२३
दि. १५/१२/२०२३